International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.5 May– June 2023

# छत्रपती शाहू महाराजांनी सुरू केलेली वसतीगृह चळवळ व त्यातून झालेले सामाजिक व शैक्षणिक बदल

**अमित अशोक पाटील**
संशोधक विद्यार्थी
**Corresponding Author:** अमित अशोक पाटील
**Email:** aapatil9449@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.12925442**

**प्रस्तावना:**

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचे सूत्रे हातात घेतली तेव्हा समाजात जातिव्यवस्थेची बंधने अतिशय कठोर होती. दलित समाजातील व्यक्तींना माणूस म्हणून जगण्यासाठी मूलभूत सोयी/गरजा सुविधा सुद्धा मिळत नसतं. तत्कालीन परिस्थितीत महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा अगोदर की राजकीय सुधारणा अगोदर हा टिळक व आगरकर वाद सुरू होताच, परंतु छत्रपती शाहू महाराजांना सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा या दोन्ही संकल्पना महत्त्वाच्या वाटतं. जातिभेद हा देशाच्या ऐक्य व प्रगतीतील प्रमुख अडसर आहे तो दूर करण्यासाठी प्रत्येक जातीने शिक्षण व जागृती याद्वारे जातीभेद दूर करण्यासाठी प्रयत्न करून सामाजिक उन्नती साधली पाहिजे असे मत छत्रपती शाहू महाराजांनी अनेक जाती परिषदांमध्ये विशद केले व बहुजन समाजाला संघटित होऊन जातिभेद निवारणाचे कार्य करण्यास प्रोत्साहित केले. प्रत्येक जातीने स्वतःचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा वाढवण्याचा प्रयत्न करावा, यातून काही काळातच जातीपातीची बंधने हळूहळू नष्ट होत जाऊन समताधिष्ठीत समाजाची प्रस्थापना होईल असा छत्रपती शाहू महाराजांना विश्वास होता. छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनात वेदोक्त प्रकरणामुळे अमुलाग्र बदल घडवून आणला. १८९९ साली छत्रपती शाहू महाराज पंचगंगा तीरी स्नान विधीसाठी जात. तेव्हा तेथे त्यांच्यासाठी नारायण राजू पाध्ये या भटजीमार्फत वेदोक्त ऐवजी पुराणोक्त मंत्राने विधी केले जात. ही गोष्ट राजारामशास्त्रींनी महाराजांच्या लक्षात आणून दिली. महाराजांनी त्याबाबत नारायण भटजींना विचारणा केली असता 'शूद्रांना वेदोक्तांचा अधिकार नाही.' असे उत्तर नारायण भटजींनी दिले व व महाराजांना शूद्र म्हणून हिणवले. या घटनेवर महाराजांनी सखोल चिंतन केले व आपल्या संस्थानात सुद्धा राजावर अशी परिस्थिती येत असेल तर सर्वसामान्य, दलित जनतेचे आयुष्य किती जाचक अटींनी व्यापलेले असू शकते याची जाणीव छत्रपती शाहू महाराजांना झाली व समताधिष्ठित समाजाची निर्मिती करायची असेल तर तळागाळातील बहुजन जनतेला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणं खूप गरजेचे आहे असा ठाम विश्वास छत्रपती शाहू महाराजांचा होता. यातून बहुजन समाजाला शिक्षण देऊन, त्यांचा दर्जा उंचावून समताधिष्ठित समाजाची स्थापन होऊ शकते असे मत छत्रपती शाहू महाराजांचे बनले. म्हणूनच छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात वसतीगृहांच्या माध्यमातून शैक्षणिक क्रांती घडवून आणण्याचा यशस्वी प्रयोग केला.

**उद्दिष्ट्ये**

१. छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा आढाव घेणे.
२. वसतीगृह चळवळीमुळे कोल्हापूर संस्थानात सुरू झालेल्या शैक्षणिक क्रांतीचा आढावा घेणे.
३. बहुजन समाजात झालेल्या बदलांचा अभ्यास पाहणे.

**पार्श्वभूमी:**

कोल्हापूर शहरात विविध शैक्षणिक सोयी उपलब्ध असल्या तरीही त्यांचा फायदा खेड्यातील गोरगरीब व मागासलेल्या विद्यार्थ्यांना शहरात राहण्याची व जेवणाची सुविधा अल्प खर्चात मिळत नसल्याने घेता येत नव्हता. १८९६ मध्ये कोल्हापूर दरबार वतीने राजाराम कॉलेजला जोडून एका हॉस्टेलची बांधणी केली. पण तिथे फक्त ब्राह्मण विद्यार्थीच राहू लागले. मग बहुजन समाजातील विद्यार्थ्यांची सोय स्वतःच्या राजवाडयात केली. परंतु मुले शिक्षणाऐवजी सरदारी थाट लवकर शिकली म्हणून महाराजांनी ही व्यवस्था बंद करून वेगवेगळया जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी वसतीगृह स्थापन केली. शाहू महाराजांचा त्या त्या जातीतील पुढाऱ्यांचे सहाय्य मिळवणे हा मूळ हेतू होता व यातून सर्व जातींना दर्जा वाढ करण्यासाठी प्रोत्साहन देऊनस समताधिष्ठित समाज निर्मिती हा उद्देश छत्रपती शाहू महाराजांचा होता.

**जातवार वस्तीगृहांची आवश्यकता:**

जातीभेद निवारणासाठी व्यक्त करणाऱ्या शाहू महाराजांनी जेव्हा जातवार विभक्त वसतीगृहांची स्थापना केली तेव्हा त्यांच्यावर खूप मोठ्या प्रमाणात टीका झाली. शाहू महाराजांचे विचार खूप प्रगल्भ होते. जसे ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वाद होता तसाच वाद ब्राह्मणेत्तर-विविध

जातीमध्ये ही होता. शेकडो वर्षांचा जातीभेद एका रात्रीत समाप्त होणे शक्य नाही असे मत शाहू महाराजांचे होते. विविध जातीच्या विद्यार्थ्यांसाठी विभक्त वसतीगृह स्थापन करून त्यांना योग्य ते शिक्षण देऊन त्यांच्यात वैचारिक प्रगल्भता आल्यानंतर विविध जातीतील उच्च-नीचता समाप्त होईल व विविध जातीतील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणामुळे विविध ब्राह्मणेत्तर जातीत सामाजिक सौख्य प्रस्थापित होईल हा त्यामागील उद्देश होता. सुरुवातीपासून सर्व जाती जमातींसाठी एकत्र वसतीगृह ही संकल्पना तत्कालीन परिस्थितीच्या विरोधी होती म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी जातवार वस्तीगृहांची स्थापना केली.

शाहू महाराजांनी जातिवाचक वसतीगृहे काढली परंतु त्यांच्यात वेगळेपणाची भावना राहू नये यासाठी शक्यतो ती शेजारी-शेजारी ठेवली. त्यांनी गंगावेशकडून रंकाळावेशकडे जाणाऱ्या रस्त्यावर सहा वसतीगृहाना व दसरा चौक परिसरात सात वसतीगृहाना जागा व काहींना इमारतीसह जागा दिल्या. विद्यार्थ्यांमध्ये जातीभेदाची भावना वाढू नये यासाठी आवश्यक व्यवस्था महाराजांनी केली होती.

**काही महत्त्वाची वसतीगृहे पुढील प्रमाणे -**

**१) विक्टोरिया मराठा बोर्डिंग :**

कोल्हापूर संस्थानात मराठा समाज बहुसंख्य होता परंतु मराठ्यांना देखील शिक्षणाचे महत्त्व माहित नव्हते व खेड्यापाड्यातील बहुसंख्य जनतेला कोल्हापुर येथे येऊन उच्च शिक्षण घेणं शक्य होत नव्हतं. खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांसाठी कोल्हापुरात कशी व्यवस्था होईल याचा विचार महाराज करीत होते. तोच वर्तमानपत्रात वडगावचा पांडुरंग चिमणाजी पाटील हा विद्यार्थी मॅट्रिक पास झाल्याचं छापून आलं. तेंव्हा त्या विद्यार्थ्याला महाराजांनी बोलावून घेऊन पुढील शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले. परंतु त्यांने असमर्थता दर्शवली व त्यावर महाराजांनी त्याला अडचणी विचारल्या व त्या त्याने सांगितल्यावर महाराजांनी पुढील शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. दुसऱ्या दिवशी दाजीराव विचारे व भास्करराव जाधव यांना बोलावून घेतले व मराठा विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह स्थापन करण्याबाबत विचारविनिमय केला. १८ एप्रिल १९०१ रोजी शाहू महाराजांच्या आज्ञेने महाराजांचे काका दत्ताजीराव घाटगे यांच्या अध्यक्षतेखाली मराठा समाजातील प्रमुख व्यक्तींची सभा भरवून मराठा एज्युकेशन सोसायटी व त्या मार्फत व्हिक्टोरिया मराठा बर्डींग हाऊसची स्थापना झाली. शाहू महाराजांच्या वडिलांना महाराणी व्हिक्टोरिया यांनी आपल्या दरबारात आदरातिथ्यपूर्वक वागवले होते म्हणून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचे नाव वसतीगृहास दिले. त्यासाठी महाराजांनी दसरा चौक येथील २५००० रुपये किमतीची इमारत व जागा व ५०० रुपये वार्षिक अनुदान व वसतीगृह वाढीसाठी ८०० रुपये किमतीची मालमत्ता दिली.

**२) मुस्लिम बोर्डिंग :**

इतर समाजाच्या तुलनेत मुस्लिम समाजात शिक्षणाबाबत फारच अनास्था होती. मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह स्थापन करण्यासाठी महाराजांनी १९०२ पासून प्रयत्न केले. सुरुवातीला फक्त दहा विद्यार्थी (मुस्लिम) सापडले. त्यांच्या शिक्षणाची सोय व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग मध्ये केली. शेवटी १५ नोव्हेंबर १९०६ रोजी महाराजांनी पुढाकार घेऊन 'मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची' स्थापना करून तिच्या मार्फत मुस्लिम बोर्डिंग सुरू करण्यात आले. दसरा चौकातील २५०० चौरस फूट जागा महाराजांनी वसतीगृहासाठी दिली व २५० रुपये अनुदान दिले.

**३) मिस क्लार्क हॉस्टेल :**

शाहू महाराजांनी या वसतीगृहाची स्थापना मुख्यतः अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांसाठी केली. अस्पृश्य वर्गातील शिक्षण अभावमुळे या वर्गात एकही पुढारी नव्हता. म्हणून शाहू महाराजांनी सवर्ण समाजातील भास्कर जाधव, महादेव डोंगरे, श्रीपतराव शिंदे, खंडेराव बागल, गणपतराव कदम या काही प्रमुख मंडळींनी पुढाकार घेऊन अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी मिस क्लार्क हॉस्टेल् स्थापन केले.

मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांची कन्या मिस व्हायोलेट क्लार्क यांनी मुंबई येथे एक नृत्याचा कार्यक्रम घेऊन त्याद्वारे पाच हजार रुपये कमावले. ते त्यांनी या वसतीगृहात देणगी म्हणून दिले म्हणून शाहू महाराजांनी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या हॉस्टेलला मिस क्लार्क यांचे नाव दिले.

**४) श्री प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डींग हाऊस:**

शाहू महाराज पुणे येथे गुरुवर्य बापूराव बच्चाजी शिंदे यांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत चालवलेल्या वसतीगृहास भेट दिली. या वसतीगृहातील मुले माधुकरी मागून अन्न गोळा करत आणि सामूहिक भोजन करून शिक्षण घेत. अशा प्रकारचे बोर्डींग कोल्हापुरात सुरू करावे म्हणून श्रीपतराव शिंदे यांच्या मागे महाराजांनी तगादा लावला. त्यामधूनच श्रीपादराव शिंदे, खंडेराव बागल, रावसाहेब सरदेसाई, श्रीपतराव मंडलिक, मामासाहेब मिणचेकर इत्यादी कार्यकर्त्यांनी मिळून गरिबीमुळे शिक्षणाला वंचित होत असलेली १० मुले सुरुवातीला निवडली व १९१८ साली शिकार करत असताना शाहू महाराजांचे धाकटे चिरंजीव प्रिन्स शिवाजी अपघाताने मरण पावले त्यांचे स्मरणात श्री प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डींग हाऊस असे नाव देण्यात आले. कालांतराने गडहिंग्लज तालुक्यातील नूल येथील रामनाथ गिरी मठाची २०० एकर जमीन या बोर्डिंगला देण्यात आली.

**५) श्री शिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय व वसतीगृह:**

धार्मिक क्षेत्रातील ब्राह्मण पुरोहितांच्या वर्चस्वास शह देण्यासाठी महाराजांनी ऑगस्ट १९१९ मध्ये ब्राह्मणेत्तरांना वैदिक शिक्षण देण्याचे वर्ग जुना राजवाड्यात सुरू केले. तेथील विद्यार्थी संख्या ४० पर्यंत वाढल्यावर जुलै १९२० मध्ये याची स्थापना केली. ब्राह्मण समाजाकडून जनतेची होणारी लूट व पिळवणूक थांबवण्यासाठी मराठा/बहुजन वर्गातील विद्यार्थ्यांना वैदिक विधीचे शास्त्रोक्त ज्ञान व शिक्षण देऊन ब्राह्मणांची मक्तेदारी मोडीत काढण्याचे कार्य श्री शिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय व वसतीगृह या मार्फत केले.

**शाहू महाराजांच्या पुढाकारांनी इतरही काही जाती-जमातीसाठी स्थापना झालेली वसतीगृह व त्यांचे स्थापना वर्ष.**

१९०१ - दिगंबर जैन बोर्डिंग
१९०६ - विरशैव लिंगायत वसतीगृह
१९०६ - मुस्लिम बोर्डिंग
१९०८ - मिस क्लार्क हॉस्टेल
१९०८ - देवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग
१९११ - नामदेव बोर्डिंग
१९१२ - पांचाळ ब्राह्मण वसतीगृह
१९१५ - सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण वसतीगृह
१९१५ - इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल
१९१५ - रावबहादुर सबनीस प्रभू बोर्डिंग
१९१८ - आर्य समाज गुरुकुल
१९१८ - वैश्य बोर्डिंग
१९१९ - ढोर-चांभार बोर्डिंग
१९२० - शिवाजी वैदिक विद्यालय वसतीगृह
१९२० - श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस
१९२१ - सुतार बोर्डिंग १९२१
१९२१ - नाभिक विद्यार्थी वसतीगृह
१९२० - सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डिंग
१९२१ - श्री देवांग बोर्डिंग
१९२१ - राजपूतवाडी बोर्डिंग
१९२१ - रुकडी बोर्डिंग
१९२१ - भोई समाज बोर्डिंग
१९२० - नाशिक – श्री.उदाजी मराठा विद्यार्थी वसतीगृह कोनशीला अध्यक्ष.

वरील वस्तीगृहांच्या स्थापनेमधून छत्रपती शाहू महाराजांनी ज्ञानदान व शैक्षणिक क्रांती घडवण्याच्या प्रयत्न केला.

**निष्कर्ष:**

छत्रपती शाहू महाराजांच्या या उदार शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला. त्याचे फलित म्हणून १९१७ /१८ साली २७ शाळांमधून १२९६ विद्यार्थी प्राथमिक शिक्षण घेत होते तर १९२१/२२ पर्यंत शाळांची संख्या ४२० होऊन विद्यार्थी संख्या २२००७ इतकी झाली. छत्रपती शाहू महाराजांच्या राज्यरोहणावेळी म्हणजेच १८९४ मध्ये ७९ कॉलेज विद्यार्थ्यांत फक्त ६ विद्यार्थी ब्राह्मणेत्तर होते बाकी सर्व ब्राह्मण. १९२२ मध्ये ही संख्या २६५ कॉलेज विद्यार्थ्यांपैकी १०० ब्राह्मणेत्तर विद्यार्थी इतकी प्रचंड वाढली. याच वसतीगृह चळवळीमुळे कोल्हापुरास 'वसतीगृहांचे माहेरघर' सुद्धा म्हटले जाऊ लागले. या वसतीगृहात शिकून तयार झालेल्या विद्यार्थ्यांनी नंतरच्या काळात सार्वजनिक कार्यात आपला ठसा उमटवला. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. आज बहुजन समाज शैक्षणिक, सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक क्षेत्रात नेतृत्व करताना दिसत आहे. त्याचे बरेचसे श्रेय या वसतीगृह चळवळीस आहे.

शाहू महाराजांच्या काळात सुरू झालेल्या या वसतीगृहाचां फायदा संस्थात तसेच संस्थांबाहेरील हजारो विद्यार्थ्यांना झाला व आजही होत आहे. बहुजन समाजातील कित्येक पिढ्या या वस्तीगृहांनी घडवल्या व आजही हे कार्य सुरू आहे. शेतीतज्ञ पी.सी.पाटील, माजी सहकार मंत्री- यशवंतराव मोहिते, ऑलिंपिक वीर खाशाबा जाधव, डॉ. एन.डी.पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.जे.पी. नाईक, लोकनेते बाळासाहेब देसाई, परराष्ट्र सचिव ज्ञानेश्वर मुळे यासारख्या अनेक व्यक्तींचा वसतीगृहाच्या विद्यार्थ्यामध्ये समावेश होतो.

वसतीगृह चळवळीतून प्रेरणा घेऊन वस्तीगृहांचे विद्यार्थी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन केली. बापूजी साळुंखे यांनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन केली. व्ही.टी.पाटील यांनी ताराराणी विद्यापीठ कोल्हापूरची स्थापना केली व नागनाथ अण्णा नायकवडी यांनी किसन आहेर शिक्षण संस्था वाळवा येथे सुरू करून वरील सर्वांनी ज्ञानदान व शिक्षण प्रसाराचे कार्य मोठया प्रमाणावर केले. त्यामुळेच बहुजन वर्गाला समाजाच्या मुख्य प्रवाहात येणे शक्य झाले व छत्रपती शाहू महाराजांच्या स्वप्नातील समताधिष्ठित समाजाची स्थापना याच वसतीगृह चळवळीमुळे खऱ्या अर्थाने होत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती; पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९७९.
२. पवार जयसिंगराव (सं.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, २००७.
३. पवार वसुधा, राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, पहिली आवृत्ती, २००४.
४. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१६.
५. येडेकर शाम, राजर्षी एक व्यक्तीदर्शन, प्रकाशन- सतीश येडेकर, कोल्हापूर.

**अमित अशोक पाटील**